तरुण भारत गुरुवार २२ डिसेंबर २०२२

# आकलन वाढीसाठी अवांतर वाचन करा

- **परिवीक्षाधीन जिल्हाधिकारी सुहास गाडे यांचे आवाहन**

प्रतिनिधी
**गडहिंग्लज**

मोठी स्वप्नें पहा, लेखन कौशल्य वाढवा, वर्तमानपत्र नियमित वाचा, आकलन क्षमता वाढण्यासाठी अवांतर वाचन करा, यश नक्की मिळेल असे आवाहन परिविक्षाधिन जिल्हाधिकारी सुहास गाडे यांनी येथे केले. संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

रवळनाथ सोसायटी, ज्ञानदीप प्रबोधीनी, इंटेट फौंडेशन यांच्या सदिच्छा भेटीप्रसंगी श्री. गाडे बोलत होते. उपविभागीय अधिकारी बाबासाहेब वाघमोडे, भूमी अभिलेख उपअधीक्षक सिद्धेश्वर घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. ध्येय निश्चित करुन प्रामाणिकपणे प्रयत्न करा. कोणतेही क्षेत्र असो निष्ठेने सेवा करा असा सल्ला देत श्री. गाडे यांनी आपल्या आवडीनिवडीनुसार माहिती देणाऱ्या इंटरनेटचा वापर जपून केला पाहिजेत. स्पर्धा परीक्षांसाठी क्रमिक पुस्तके फार महत्त्वाची आहेत. याचा अभ्यास करा असेही सांगितले. श्री. वाघमोडे यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये खूप गुणवत्ता आहे. परंतु त्यांना दिशा देण्याची गरज आहे असे सांगितले. श्री. चौगुले, श्री. घुले यांनीही मार्गदर्शन केले. बाबासाहेब आजरी यांनी स्वागत, मीना रिंगणे यांनी आभार मानले. सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. के. मायदेव, विजयकुमार घुगरे, महेश मजती, डॉ. संजय चौगुले, रेखा पोतदार, डी. के. मायदेव, संदीप कागवाडे, प्रा. मनोहर गुरबे, गौरी बेळगुद्री आदी उपस्थित होते.



**गडहिंग्लज : भेटीप्रसंगी बोलताना परिविक्षाधीन जिल्हाधिकारी सुहास गाडे, व्यासपीठावर सिद्धेश्वर घुले, एम. एल. चौगुले, बाबासाहेब वाघमोडे आदी.**